# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः25.07.2024** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

- राज्याच्या विविध भागात मुसळधार पाऊस
- पुणे, सातारा जिल्ह्यांना अतिवृष्टीचा इशारा, खडकवासला धरणातून पाण्याचा मोठा विसर्ग, नागरिकांना सावधानतेचा इशारा, पुणे शहरातील शाळा आज बंद
- केंद्रीय अर्थसंकल्पात निधी वाटप करताना राज्यांसोबत भेदभाव केल्याचा आरोप केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी फेटाळला  आणि
- येत्या 5 वर्षांत मुंबईत 250 नव्या उपनगरीय रेल्वेगाड्या धावणार

**पाऊस**

**एक अतिशय महत्वाची सूचनाः**

हवामान विभागानं येत्या काही तासात **पुणे** शहर आणि घाट क्षेत्रात मुसळधार पावसाचा इशारा दिला असल्यानं भोर, वेल्हा, मावळ, मुळशी, हवेली तालुक्यातील खडकवासला परिसर आणि पुणे शहरातील शाळा आज बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉक्टर सुहास दिवसे यांनी दिले आहेत. खडकवासला धरणातून 44 हजार क्यूसेक या प्रमाणात विसर्ग सुरू होत आहे. पुणे शहराच्या सखल भागात पाणी साचण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी दक्षता बाळगावी आणि आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावं असं आवाहन जिल्हाधिकारी दिवसे यांनी केलं आहे. पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील काही सोसायटींमध्ये पुराचं पाणी शिरलं आहे. त्यांची नावं अशीः  द्वारका, जलपुजन, शारदा सरोवर आणि शाम सुंदर. दरम्यान राज्याच्या विविध भागात मुसळधार पाऊस पडत आहे. **कोल्हापूर** जिल्ह्यात काल संध्याकाळपर्यंत पंचगंगा नदीतील पाणी पातळी धोका पातळीच्या जवळ आली होती. राधानगरी धरण

95 टक्के भरल्यामुळे स्वयंचलित दरवाजे उघडले जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. दूधगंगा धरणातून पाणी सोडण्यात आलं असून वारणा धरणातूनही पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. त्यामुळे जिल्ह्यातील सर्वच नद्यांचं  पाणी विस्तीर्ण पसरलं आहे. 63 मार्गावरील वाहतूक थांबली असून एसटीचे 20 मार्ग बंद झाले आहेत. यामध्ये कोल्हापूर ते गगनबावडा, कोल्हापूर ते रत्नागरी या मार्गांचा समावेश आहे. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला असून, पूरबाधित गावातील नागरिकांना हलवण्यात आलं आहे. **सांगली** जिल्ह्यातील वारणा आणि कृष्णा नद्यांचं पाणी पात्राबाहेर आलं असून अनेक पिकांचं नुकसान झालं आहे. कृष्णा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत असून नदीकडच्या नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वारणा धरणातून सुरू असलेल्या विसर्गात वाढ करुन पाणी नदी पात्रात सोडण्यात येत आहे. **सातारा** जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी 539 मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून जिल्ह्यातील धरणांमध्ये भरपूर पाणी साठा झाला आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात काल दिवसभर पावसाची संततधार सुरू होती. त्यामुळे हवेत गारवा निर्माण झाला होता. जिल्ह्यात खरीपाच्या पेरण्या पूर्ण झाल्या असून खरीपाच्या पिकांना हा पाऊस दिलासादायक ठरला आहे. **गडचिरोली** जिल्ह्यात भामरागडनजीक पर्लकोटा नदीला पुन्हा पूर आला. नदीच्या पुलावरुन पुन्हा पाणी वाहू लागलं. गोसेखुर्द धरणासह अन्य धरणांमधून मोठा विसर्ग होत असल्याने अनेक नदी, नाल्यांचा पूर कायम असून, या प्रमुख मार्गांसह 18 मार्गांवरील वाहतूक ठप्पच आहे. गोसेखुर्द धरणातून होणारा विसर्ग वाढविण्यात येणार असून, नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहण्याचा इशारा जिल्हा प्रशासनानं दिला आहे. **पालघर** जिल्ह्यात  तानसा धरण पूर्ण क्षमतेनं भरलं  असून काल संध्याकाळी धरणाच्या तीन दरवाजातून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. धामणी धरणाचे 3 दरवाजे उघडले असून सूर्या नदीत पाण्याचा विसर्ग सुरु आहे. सूर्या नदीच्या काठी असलेल्या 65 पेक्षा अधिक गावांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.अकोल्यातही काल पावसाला सुरुवात झाली आहे. **रत्नागिरी** जिल्ह्यात खेडमधली जगबुडी नदीनं रात्री 10 वाजताच्या स्थितीनुसार, धोका पातळी ओलांडली आहे. धोका पातळी 7 मीटर्स असून, सध्या पाणीपातळी 8 मीटर्स आहे. 22 जुलैपर्यंत जिल्ह्यात 59 टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे.

**यवतमाळ**  जिल्ह्यात पांढरकवडा इथली खुनी नदी तुडुंब वाहत असल्यामुळे मांडवी ते पाटणबोरी मार्गावरचा पूल पाण्याखाली गेला  असून हा मार्ग बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहे. भंडारा जिल्ह्यात काल पूरस्थिती निर्माण झाल्यामुळे बावनथडी नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. भंडारा तुमसर बालाघाट आंतरराज्यीय मार्ग - वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. त्यामुळं महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश राज्याच्या संपर्क तुटला आहे.  गोसे धरणाचे 5 दरवाजे उघडले असून यामधून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. वैनगंगा नदीनं धोका पातळी ओलांडली आहे. नाशिकमध्ये इगतपुरी तालुक्यातील भावली धरण 100 टक्के भरलं आहे, त्यातून विसर्ग सुरू करण्यात आला आहे.  नाशिक

शहरात 48 तासात 45 मिलिमीटर पावसाची नोंद झाली तर त्र्यंबकेश्वर इथं एकाच दिवसात 100 मिलिमीटर पाऊस झाला. इगतपुरीमध्ये 49 मिलिमीटर पाऊस झाला. गंगापूर धरण समूहात एकंदर 35 टक्के पाणीसाठा झाला आहे. **मुंबई** महानगरपालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणा-या 7 तलावांपैकी तानसा तलाव काल ओसंडून वाहू लागला. तुळशी तलावही यापूर्वीच भरून वाहू लागला आहे. काल सकाळी सातही तलावांमध्ये अंदाजे 59 टक्के पाणीसाठा झाला आहे. **पालघर, रायगड, पुणे आणि सातारा** जिल्ह्यात अति-मुसळधार पाऊस पाडण्याचे शक्यता असून इथं धोक्याचा लाल बावटा; तर मुंबईसह **ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, नाशिक आणि कोल्हापूर** जिल्ह्याला मुसळधार पावसाचा नारंगी बावटा हवामान विभागानं जारी केला आहे.

**अर्थ संकल्प चर्चा**

केंद्रीय अर्थसंकल्पावर काल संसदेत चर्चा सुरू झाली. केंद्रीय अर्थसंकल्पात निधी वाटप करताना काही राज्यांसोबत भेदभाव केल्याचा आरोप केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी फेटाळून लावला. विरोधी पक्षांचं सरकार असणाऱ्या राज्यांना काहीही दिलं नाही, असा भ्रम काँग्रेस पसरवत असल्याचं सीतारामन यांनी राज्यसभेत शून्य तासातल्या चर्चेत सांगितलं. अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये प्रत्येक राज्याचं नाव घेणं शक्य नसतं, पण नाव घेतलं नाही म्हणजे त्या राज्यांना काहीच दिलं नाही, असं होत नाही, असं सीतारामन  यांनी स्पष्ट केलं. लेखानुदान आणि अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्र आणि पश्चिम बंगालमधल्या अनेक विकास प्रकल्पांना मंजुरी दिल्याचं अर्थमंत्र्यांनी नमूद केलं. तत्पूर्वी केंद्रीय अर्थसंकल्पात निधी वाटपाबाबत  भेदभाव करण्यात आल्याचा आरोप करत विरोधी पक्षांनी काल संसद भवनाच्या आवारात निदर्शनं केली. केंद्रीय अर्थसंकल्पात निधीचं वाटप करताना विरोधी पक्षांचं सरकार असणाऱ्या राज्यांवर अन्याय झाल्याची टीका काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी सदनात केली. मंत्र्यांनी विरोधी पक्षाच्या आक्षेपांना उत्तर दिल्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला. लोकसभेतही विरोधी पक्षांनी याच मुद्यावरून निदर्शनं केली. सभापती ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षांची ही कृती योग्य नसल्याचं मत व्यक्त केलं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजु यांनीही विरोधी पक्षांवर टीका केली. संसदेचं कामकाज सुरळीत चालावं यावर विरोधी पक्षांनी सर्वपक्षीय बैठकीत सहमती दर्शवली होती, त्यामुळे त्यांची ही कृती योग्य नाही, असं रिजिजु म्हणाले.

**रेल्वे वैष्णव**

मुंबई उपनगरीय रेल्वे यंत्रणेची क्षमता वाढवण्याचं काम वेगाने सुरू असून येत्या 5 वर्षांमध्ये अंदाजे 250 नव्या रेल्वे धावणार आहेत, अशी घोषणा केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल केली. दूरस्थ पद्धतीनं घेतलेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते.  उपनगरीय रेल्वे आणि दूरच्या पल्ल्याच्या गाड्यांच्या यंत्रणा वेगवेगळ्या करणं, त्यासाठी वेगवेगळे आराखडे तयार करणं, दोन उपनगरीय रेल्वेमधलं अंतर 180 सेकंदांवरून कमी करून 150 सेकंदांवर आणण्याच्या दिशेनं प्रयत्न सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं. बाहेरच्या, लांब पल्ल्याच्या गाड्यांची 4 भव्य टर्मिनल तयार होणार असून किनारी मार्ग, मेट्रोमुळे उपनगरीय रेल्वेवरचा भार मोठ्या प्रमाणात कमी होईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. रेल्वे सुरक्षेसाठी कवच यंत्रणा लवकरात लवकर देशभरात सुरू करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**चंद्रकांत पाटील**

राज्यातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती देण्यासाठी उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आज सकाळी 10 ते 12 या वेळेत महाविद्यालयीन प्राचार्य, विद्यार्थी आणि पालकांसोबत वेबिनारच्या माध्यमातून संवाद साधणार आहेत. या महितीसत्रात  पार्थलाईव्ह डॉट कॉम  parthlive.com या संकेतस्थळावर सहभागी होता येईल अशी माहिती उच्च आणि तंत्र शिक्षण विभागानं दिली आहे.

**हॉकी**

छत्तीसगड इथं सुरु असलेल्या द्वितीय हॉकी इंडिया कनिष्ठ गटाच्या पश्चिम विभागीय स्पर्धेत हॉकी महाराष्ट्र  महिला संघ उपांत्य फेरी गाठणारा पहिला  संघ ठरला. महाराष्ट्राने दादरा-नगर हवेली आणि दमण-दीव हॉकी टीमचा 13-0 असा धुव्वा उडवला. महाराष्ट्र कनिष्ठ पुरुष संघाला मात्र हॉकी मध्य प्रदेशविरुद्ध 4-7 असा पराभव पत्करावा लागला. या पराभवानंतर ते राऊंड-रॉबिन लीगमध्ये 6 गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहेत.

**हवामान**

कोकण, आणि मध्य महाराष्ट्रात अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागाने वर्तवला असून पुढील काही दिवस मुसळधार ते अति मुसळधार पाऊस सुरूच  राहण्याची शक्यता आहे.

**एक अतिशय महत्वाची सूचनाः**

हवामान विभागानं येत्या काही तासात पुणे शहर आणि घाट क्षेत्रात मुसळधार पावसाचा इशारा दिला असल्यानं भोर, वेल्हा, मावळ, मुळशी, हवेली तालुक्यातील खडकवासला परिसर आणि पुणे शहरातील शाळा आज बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉक्टर सुहास दिवसे यांनी दिले आहेत. खडकवासला धरणातून 40 हजार क्यूसेक या प्रमाणात विसर्ग सुरू होत आहे. पुणे शहराच्या सखल भागात पाणी साचण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी दक्षता बाळगावी आणि आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावं असं आवाहन जिल्हाधिकारी दिवसे यांनी केलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**